
सिद्धी प्रकाशन
SIDDHI PUBLICATION
9623979067
Worldwide International Inter Disciplinary Research Journal
(A Peer Reviewed)
Year - 6, Vol.I, Issue-XXIII, 14 March 2020
Special Issue for Sanskrit
One day National Level Interdisciplinary Conference
संस्कृत-मराठी ऋणानुबंध
Address for Correspondence

ISSN: 2454 - 7905

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

*A Peer Reviewed Referred Journal*

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

website: WWW.WIIDRJ.com

**Vol. I　　Special ISSUE - XXIII　　Year – 6　　14 March 2020**

**भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई.**

## स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड.

**Special Issue for Sanskrit**

## One Day National Level Interdisciplinary Conference

(एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद)

# संस्कृत - मराठी ऋणानुबंध

**संपादक**

**प्रा. सचिन कंदले**
आयोजक व संस्कृत विभाग प्रमुख

**डॉ. संजय शिरोडकर**
प्राचार्य व संयोजक
स्वा. सावरकर महाविद्यालय. बीड.

**सह संपादक**

प्रा. डॉ. सोपान सुरवसे
प्रा. डॉ. रमेश गटकळ
प्रा. आनंद रत्नपारखे
प्रा. अशोक रुपनोर

**Bhartiy Shikshan Parasarak Sanstha**
**Kholeswar Madhyamic Vidyalaya, Ganesh Nagar, Kuttar Vihir Ambejogai.**
**Email: bsps2011@rediffmail.com**

**::Address for Correspondence::**
**Mrs. Pallavi Laxman Shete**
Editor in Chief: **Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred)**
Principal, Sanskrti Public School, Nanded (MH. India)
**Email: Shrishprakashan2009@gmil.com　Website: WWW.WIIDRJ.com**
**Dr. Rajesh G. Umbarkar**
House No.624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605(India –Maharashtra)
**Email:**umbarkar.rajesh@yahoo.com Shrishprakashan2009@gmil.com **Mob. No:** 9623979067
**Director : Mr. Tejas Rampurkar** (For International contact only +91-8857894082)

| | | | |
|---|---|---|---|
| 93. | कर्णभार नाटकातील कर्णाचे दान | सुतार सोनाली रंगनाथ | 349 |
| 94. | संस्कृत भाषेची निर्मिती व्याप्ती आणि महत्व | प्रा. नवनाथ ज्ञानोबा पवळे | 351 |
| 95. | योगेन चित्तस्य पदेन वाचां मलं शरीरस्य च वैद्यकेन। | डॉ.गणंजय यज्ञेश्वरराव कहाळेकर | 353 |
| 96. | संस्कृतातील तत्सम तद्भव शब्द | प्रा. विजया दे. जगताप | 357 |
| 97. | अभिजात : शाकुंतलं सेव्यताम् | प्रा. जयश्री सुरजीलाल बनगे | 361 |
| 98. | ऋग्वेदातील सूक्तांमधून व्यक्त होणारे निसर्गप्रेम | प्रा. ओंकार रमेश पाठक | 367 |
| 99. | आरोग्यवर्धिनी तुळस | प्रा. सचिन कंदले | 370 |
| 100. | प्रवास मत्स्योपाख्यानाचा | डॉ. ओंकार शामसुंदर जोशी | 372 |
| 101. | कौटिल्याची चाणक्या निती आणि आजची व्यापार परिस्थिती | प्रा. डॉ. काळे डी. बी. | 375 |
| 102. | संस्कृत सुभाषिते व म्हणी | प्रा. डॉ. सौ. पौर्णिमा चंद्रकांत मोटे | 378 |
| 103. | संस्कृत भाषा व मराठी भाषा साम्यस्थळे | सुवर्णा बाबुराव कळसे | 381 |
| 104. | विज्ञान आणि अध्यात्म अद्वैत भाव : संस्कृत भाषेचे महत्व | स्वाती कुलकर्णी | 385 |
| 105. | मानव जीवन में योग का महत्त्व” | प्रा. डॉ. भारती एस. आर. | 389 |
| 106. | श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीतील कर्मविचार | स्वप्नील ठाकरे | 392 |
| 107. | गाथासप्तशती: एक अन्वयार्थ | डॉ. गोवर्धन काशीनाथ मुळक | 397 |
| 108. | यज्ञ : पर्यावरणावर होणारा परिणाम | डॉ. विनोदकुमार विलासराव वायचळ 'वेदार्य' | 402 |
| 109. | संगीत शाकुंतल'व 'अभिज्ञानशाकुन्तलम्' नाटकांमध्ये असलेले साम्यभेद | डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | 405 |
| 110. | संस्कृत भाषा व मराठी भाषा उच्चारणशास्त्र | Aditi Madhavan | 411 |
| 111. | विभक्तीविचार संस्कृत व मराठी भाषेच्या संदर्भात | डॉ. विजयकुमार शिवदास ढोले | 416 |
| 112. | मानवी जीवनात योगाचे महत्त्व | डॉ.भगवान शंकरराव वाघमारे | 419 |
| 113. | संस्कृत व पाली भाषा सहसबंध | प्रा. बनसोडे जी.एस. | 422 |
| 114. | यज्ञ पद्धतीचा पर्यावरणावर होणारा परिणाम | डॉ. जगदाळे किरण आगतराव | 424 |
| 115. | अग्निहोत्र – वैज्ञानिक दृष्टीतून | अश्विनी गोविंदराव वडीकर | 427 |
| 116. | नाट्यशास्त्रात वर्णन केलेले नाट्यगृह - रचना व प्रकार | प्रा. एॅ. प्रज्ञा कोनार्डे<br>प्रा. सौ. कल्याणी आलेंक चामणीकर | 431 |
| 117. | भरतमुनीच्या नाट्यशास्त्राचा मराठी नाटकावर प्रभाव | प्रा. डॉ. राजकुमार किशनराव यल्लावाड | 437 |
| 118. | मराठी कीर्तन परंपरेवरील संस्कृत भाषेचा प्रभाव | वसुदेव पाटलोबा मुंडे | 440 |
| 119. | काश्यपीय कृषिसूक्तीवर्णित धान लागवडीच्या पद्धती | मंगेश पाठक | 445 |
| 120. | संस्कृत भाषेचा विज्ञावर असलेला प्रभाव | Prakash Shantaram Khedlekar | 452 |

# यज्ञ : पर्यावरणावर होणारा परिणाम

डॉ. विनोदकुमार विलासराव वायचळ 'वेदार्य'
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद.

"अन्नाद् भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भव:|
यज्ञाद् भवति पर्जन्य: यज्ञ: कर्मसमुद्भव:||"
"यथेह क्षुधिता बाला मातरं पर्युपासते|
एवं सर्वाणि भुतान्यग्निहोत्रमुपासते||"

**विषय प्रवेश:**

ऋग्वेदातील एका मंत्रामध्ये यज्ञाच्या प्रथम दिवशी ब्रह्मा आणि यजमान यांच्या प्रश्नोत्तराचा एक प्रसंग आहे. तेथे ब्रह्मा यजमानाला विचारतो की "........पृच्छामि यत्र भुवनस्य नाभि:|" अर्थात् जेथे ज्या ठिकाणी सर्व कांही बंधनात बांधले जाते ते केंद्र कोठे आहे? काय आहे? या प्रश्नाच्या उत्तरादाखल यजमान म्हणतो की, "............अयं यज्ञो भुवनस्य नाभि:|" अर्थात् हे यज्ञच संपूर्ण विश्वाची नाभी आहे. चतुर्वेदभाष्यकार आचार्य सायण यांनी "अयं यज्ञो भूतमात्रस्य संनहनम्| तत्रैव वृष्ट्यादिसर्वफलोत्पत्ते: सर्वप्राणिनां बन्धकत्वात्|" अर्थात् "यज्ञाच्या माध्यमातून वृष्टी आदी व वृक्ष-वनस्पती इत्यादी समस्त विश्व सम्यक प्रकारे फुलते फळते आहे, त्याच प्रकारे प्राणिसमूह यज्ञाच्या लाभाने लाभान्वित होतो."

**'यज्ञ' शब्दाची व्याख्या:**

यज्ञ शब्दाची व्याख्या करण्यापूर्वी त्याची व्युत्पत्ती आणि निरुक्ती पाहण्याची आवश्यकता आहे. यौगिक प्रक्रियेमध्ये यज्ञ शब्दाची धात्वर्थ सिद्धी – " यज देवपूजासङ्गतिकरणदानेषु " धातुपाठाच्या 'यज' धातूला "यजयाजयतविच्छप्रच्छरक्षो नङ्|" या पाणिनीय सूत्रानुसार 'नङ्' प्रत्यय झाल्यावर होते. येथे आचार्य पाणिनी यांना असा अर्थ अभिप्रेत आहे की " असे कर्म ज्यामध्ये देवपूजा, विद्वानाची संगती आणि दान या तिन्ही क्रिया एकेकट्या किंवा सामुहिक रुपात उपस्थित असतात ते कर्म म्हणजे यज्ञ होय. "

वेदांची निरुक्तीपरक व्याख्या करणा-या आचार्य यास्क यांनी यज्ञाचे विविध अर्थ सांगताना म्हटले आहे की " प्रख्यातं यजतिकर्म इति नैरुक्ता:, याञ्चो भवतीति वा, यजुंषि एवं नयन्ति इति वा "

शतपथ ब्राह्मण या ग्रंथामधील यज्ञाचा बहुव्यापी अर्थाचा अभ्यास करून सुप्रसिद्ध विद्वान पं. बुद्धदेव विद्यालंकार लिहितात की " सामुदायिकं योगक्षेममुद्दिश्य समुदायाङ्गतया क्रियमाणम् कर्म यज्ञ:| " अर्थात् समुदायाच्या/ समाजाच्या कल्याणाच्या इच्छेने समुदायाच्या एखाद्या अंगाद्वारे केले जाणारे कर्म म्हणजे यज्ञ होय.

यज्ञ मीमांसाकार यज्ञाच्या अर्थविस्ताराकडे संकेत करीत व्याख्या सांगतात की "येन सदनुष्ठानेन सम्पूर्ण विश्वकल्याणं भवेदाध्यात्मिकाधिदैविकधिभौतिकतापत्रयोन्मूलनं सुकरं स्यात् तत् यज्ञपदाभिधेयम्||" अर्थात् ज्या पवित्र कर्माने संपूर्ण विश्वाचे कल्याण होऊ शकते आणि संपूर्ण विश्वाच्या आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक कष्टांचे मूलोन्मूलन अतिसरलतेने होते, ते कर्म यज्ञ या पदाने जाणले जाते.

या प्रकारे उपरोक्त व्याख्यानुसार आपण म्हणू शकतो की " ते कर्म ज्याने दैविक शक्तींचे पोषण, विद्वत्समाजाचा सन्मान आणि संपूर्ण विश्वाच्या जड-चेतन पदार्थांच्या कल्याणाची कामना अभिप्रेत असते तेच कर्म यज्ञ आहे."

प्राचीन भारतामध्ये यज्ञ प्रत्येक कर्म, प्रत्येक वेळी, प्रत्येक लाभाशी जोडलेले होते. यासाठी शास्त्रीय ग्रंथामध्ये यज्ञाचे विधान अत्यंत विस्ताराने प्राप्त होते. धर्मसूत्रांमध्ये सात पाकयज्ञ, सात हविर्यज्ञ, सात सोमयज्ञ यांच्या प्रकार-उपप्रकार इ. एक्कवीस यज्ञांचे वर्णन आहे. ब्राह्मणकार यज्ञाचे पाच प्रकार मानतात. श्रौतसुत्रांमध्ये तेरा यज्ञांचे वर्णन आहे. स्मृतिकार अपरिहार्य पाच दैनिक यज्ञांचे विधान करतात आणि त्यांना महायज्ञ मानतात. "पञ्चैतान्तु महायज्ञान् – यथाशक्ति नहापयेत्| अध्यापनं ब्रह्मयज्ञ: पितृयज्ञस्तु तर्पणम्| होमो देवो बलिर्भौतो नृयज्ञो अतिथिपूजनम्||" गीताकार सुद्धा अन्य पाच यज्ञांचा उल्लेख करतात. " द्रव्य यज्ञास्तपोयज्ञा योग यज्ञास्तथापरे| स्वध्यायज्ञान यज्ञाश्च यतय: संशित व्रता :| " श्रीमद्भगवद्गीतेमध्येच प्रचलित यज्ञांना सात्विक, राजसी आणि तामसी यज्ञांमध्ये वर्गीकृत केले आहे. "अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते| याष्टव्यमेवेति मन:

समाधाय स सात्विक:||" "अभिसन्धाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत्| इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम्||" "विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणाम्| श्रद्धारहितं यज्ञं तामसं परिचक्षते|| "

गृह्यसूत्रकार सर्व प्रचलित यज्ञांना अन्य तीन प्रकारांत वर्गीकृत करतात. नित्य, नैमित्तिक आणि काम्य! नित्य – पाच महायज्ञ म्हणजेच ब्रह्म यज्ञ, देव यज्ञ, पितृ यज्ञ, बलिवैश्वदेव यज्ञ व अतिथी यज्ञ. नैमित्तिक म्हणजे – सोळा संस्कारांचे यज्ञ, ऋतू यज्ञ, नवान्न यज्ञ इ. तर काम्य म्हणजे विशेष कामनेने केले जाणारे यज्ञ जसे – वर्षेष्टी यज्ञ, पुत्रेष्टी यज्ञ इ.

**पर्यावरण आणि अग्निहोत्र यज्ञ :**

या प्रकारच्या विविध यज्ञांमध्ये सुद्धा सामान्य माणसासाठी अनिवार्य अग्निहोत्र अत्यंत महत्वाचा यज्ञ प्रकार आहे. सर्वांनी मरेपर्यंत अग्निहोत्र करीत राहावे असे ही म्हटले जाते. "एतद्वै जरामर्यं सत्रं यदग्निहोत्रम्| जरया ह वा मुच्यते मृत्युना वा||" शतपथ ब्राह्मण ग्रंथामध्ये अग्निहोत्राला सर्व याध्यांमध्ये प्रमुख यज्ञ मानतात. "मुखं वा एतद्यज्ञानां यदग्निहोत्रम्|" जैमिनीय ब्राह्मण ग्रंथामध्ये अग्निहोत्राला सर्व दोषांपासून मुक्त करणारे म्हटले आहे. "सर्वस्मात्पाप्मनो निर्मुच्यते स य एवं विद्वानग्निहोत्रं जुहोति|"

**पर्यावरण शुद्धीमध्ये यज्ञाचे योगदान:**

प्राचीन भारतात प्रत्येक ऋतूच्या आरंभी ऋतू यज्ञ व्हायचे. यांनाच चातुर्मास यज्ञ असे ही म्हटले जायचे. या प्रकारच्या यज्ञामुळे प्रत्येक ऋतू परिवर्तनामुळे होणा-या रोगादिंचे शमन पूर्वीच व्हायचे. म्हणूनच या यज्ञांना भैषज्य यज्ञ म्हणजेच औषधी यज्ञ म्हटले जायचे. "भैषज्ययज्ञा वास्तु यच्चातुर्मास्यानि| ऋतुसन्धिषु व्याधिर्जायते, तस्मादृतुसन्धिषु प्रयुज्यते| "

एकशे पंचेचाळीस वर्षांपूर्वी महर्षी दयानंद सरस्वतींनी औद्योगिक युगामधील क्रियाकलापांमुळे उत्पन्न विषम अवस्थेचे निवारण करण्यासाठी अग्निहोत्रादी यज्ञ करण्याचे विधान केले होते. " इन दिनों होम के न्यून होने से बार-बार वायु बिगड़ रही है, सदा विलक्षण रोग उत्पन्न होते जा रहे हैं|.....पहले आर्य लोगों का ऐसा सामाजिक नियम था कि प्रत्येक प्रात:काल स्नानकर सोलह आहुति देता था, क्योंकि प्रात:काल में मलमूत्रादिकों की दुर्गन्ध उत्पन्न होती थी वह प्रात:काल के हवन से दूर होती थी| इसी तरह सायंकाल में हवन करने से दिनभर की जमा हुई जो दुर्गंधि उत्पन्न होती थी, उसका नाश होकर रात भर वायु निर्मल और शुद्ध चलाती थी|........सुवृष्टि और वायु शुद्धि होम हवनादि से होती है, इसलिए होम करना चाहिए|"

महर्षी दयानंद सरस्वती आपल्या यजुर्वेद भाष्यामध्ये सुद्धा वायू व वृष्टीच्या शुद्धतेसाठी यज्ञाच्या अनुष्ठानाचे महत्व सांगतात. "जैसे यज्ञ के अनुष्ठान से वायु और जल की शुद्धि और पुष्टि होती है, वैसी दूसरे उपाय से कभी नहीं हो सकती|"

**प्रदूषण निवारणामध्ये उपयोगी यज्ञ:**

"माती, पाणी, उजेड, वारा| तूच मिसळशी सर्व पसारा| आभाळच मग ये आकारा||" पृथ्वी (माती), आप (पाणी), तेज (उजेड), वायू (वारा) आणि आकाश (आभाळ) हे पाच महाभूते मानली जातात. आज-काल मृत्तिका प्रदूषण (जमिनीची धूप), जल प्रदूषण, वृष्टी प्रदूषण (आम्ल वर्षा/ अतिवृष्टी/ अनावृष्टी), आकाश-प्रकाश प्रदूषण (शहरात तारे मोजता न येणे), वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, अन्न प्रदूषण (भेसळ), दूध प्रदूषण, औषध प्रदूषण, रंग प्रदूषण, किरणोत्सारी प्रदूषण असे अनेक प्रकारचे प्रदूषण पहावयास मिळतात. पाखंडी लोक विचार प्रदूषण तसेच आचार प्रदूषण सुद्धा करतात. या सर्व प्रदूषण प्रकारांवर यज्ञ हा एकमेव उपाय आहे, हे विज्ञानाने सुद्धा सिद्ध केले आहे.

यज्ञाच्या प्रदूषण निवारणामध्ये योगदानाबावत सर्वात महत्वाचे कार्य मानवासहित सर्व प्राण्यांचे रोगनिवारण आहे. यज्ञामुळे आपल्या वातावरणातील अनेक रोगकारक विषाणू, जीवाणू, कीटाणू नष्ट होतातच. त्याच बरोबर यज्ञशेष भस्मातून देखील अनेक प्रकारचे मलम तयार केली जातात. मुंबई येथील जीवाणू वैज्ञानिक डॉ. मोंडकर, चंद्रशेखर आझाद कृषी विद्यापीठ, कानपूर येथील रोगाणु विज्ञान विभागातील डॉ. व्ही. आर. गुप्ता व डॉ. आर. व्ही. मिश्र, दिल्ली येथील सेनेतील डॉ. डी. बी. के. राव, कर्नल डॉ. आर. एस. तिवारी, एम. जे. पी. कृषी विद्यापीठ, पुणे येथील डॉ. व्ही. जी. भुजबळ, डॉ. बसंत परांजपे, अमेरिकेचे डॉ. क्रीस्ताफोर बर्ड, डॉ. पीटर टोमकिन्स, डॉ. जॉन ब्राऊन, डॉ. वैरी रेथनर, डॉ. एन्ड्रू जक्सन, पोलंड येथील डॉ. एल्सवीटा गेप्लेका इत्यादिनी प्रयोगातून सिद्ध केले आहे की यज्ञामुळे अनेक रोगांचा उपचार सहजपणे करता येतो.

अमेरिकेतील वाशिंगटन येथील अग्निहोत्र विद्यापीठ प्राध्यापकांनी आपल्या प्रयोगांचे निष्कर्ष देताना लिहिले आहे की "यज्ञाच्या धुराने अमेरिकेतील पिकांचे नुकसान करणारे आलुवीनी नावाच्या जीवाणूला संपुर्णपणे

नष्ट करण्यात यश मिळविले आहे. या प्रयोगानुसार यज्ञधूम्राद्वारे आठ किलोमीटरच्या परिसरातील वायू प्रदूषण संपले असून रोगाणू-कीटाणू नष्ट करून त्या क्षेत्रातील पिकांचे प्रमाण वाढले आहे."

निष्कर्ष रूपाने आपण सांगू शकतो की जर आपण पुन्हा यज्ञ संस्थेचे पुनरुज्जीवन केले तर नक्कीच परमवैभव प्राप्त करू शकतो आणि पुन्हा विश्वगुरु होऊ शकतो यात कुठली ही शंका असू नये.

**संदर्भग्रंथ:**


1. श्रीमद्भगवद्गीता ३|१४
2. मुण्डकोपनिषद १| २| ५
3. ऋग्वेद १|१६४|३४
4. ऋग्वेद १|१६४|३५
5. □ाणिनीय अष्टाध्यायी ३|३|९०
6. निरुक्तम् ३|४|१९
7. शत□थ के दश □थ
8. यज्ञ मीमांसा पृ. ८
9. गौतमधर्मसूत्र ८|८
10. ऐतरेयब्राह्मण २|३
11. कात्यायन श्रौतसूत्र – अध्याय ४
12. मनुस्मृति ३|७०
13. श्रीमद्भगवद्गीता ४|२८
14. श्रीमद्भगवद्गीता ७|११
15. श्रीमद्भगवद्गीता ७|१२
16. श्रीमद्भगवद्गीता ७|१३
17. शत□थ ब्राह्मण १२|४|१|१
18. शत□थ ब्राह्मण ३|१|८|२
19. जैमिनीय ब्राह्मण १| ९
20. गो□थ ब्राह्मण ३|१|११
21. उ□देश मंजिरी (□ूना प्रवचन) – २० जून १८७५
22. यजुर्वेद भाष्य
23. कवीवर्य गजानन दिगंबर माडगुळकर यांचे गीत
24. □र्यावरण प्रदूषण की समस्या के सन्दर्भ में अथर्ववेद का अध्ययन – पृ. ९७
25. Man Environment and Agnihotra
26. Agnihotra Therapy our Last Chance
27. Secret Life of Plants
28. Science of Cloud Rainning
29. नवनीत (मासिक) – १९८१, मुंबई